गावठ क्र. १११०/२०२३
रत्नागिरी शहर पो.ठाणे
दिनांक ०२/०२/२०२३

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** रत्नागिरी **P.S.(ठाणे):** रत्नागिरी शहर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0029 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 02/02/2023 13:53

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार
**Time Period (कालावधी):** पहर 4
**Date From (दिनांक पासून):** 01/02/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 01/02/2023
**Time From (वेळेपासून):** 10:22 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 11:18 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 02/02/2023 **Time (वेळ):** 13:28 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 035

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/02/2023 13:28 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 8 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** वाजताचे दरम्याने हटेल संगम र,रिजेन्सी रेस्टरंट रेल्वे ,स्टेशन जवळ येथे ताजि रत्नागि

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** विलास शिवराम पेडणेकर 9422052490

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1967

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मुपोकोदवली, साईनगर,ताराजापुर,जिरत्नागिरी,रत्नागिरी शहर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मुपोकोदवली, साईनगर,ताराजापुर,जिरत्नागिरी,रत्नागिरी शहर,रत्नागिरी, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | 1शेखर मुरलीधर नेवे 9325927697 | | | 1. फ्लॅट23,श्रीसाई मधुरा प्रसाद कोऑपरेटि,हाउसिंग सोसायटी लिमिटेड,पितांबर लेन एमएमसीक्रस रस्,नं2 माहिम वेस्ट मुंबई,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |
| 2 | 2 प्रकाशकुमार री मंडल | | | 1. राकलिना मुंबई ,रत्नागिरी शहर, रत्नागिरी,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)** 45,000/-
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्यादी जबाब दिनांक 02/02/2023

मी विलास शिवराम पेडणेकर, वय 56 वर्षे, रा. मु.पो.कोदवली, साईनगर, ता.राजापुर, जि.रत्नागिरी, मो.नं. 9422052490 फिर्याद लिहून देतो की,

मी वरील ठिकाणी राहत असुन माझ्या नावे असलेल्या पासपोर्टची मुदत संपल्याने नवीन पासपोर्ट मिळणेकरीता पासपोर्ट ऑफीस यांचेकडे ऑनलाईन अर्ज सादर केला होता. त्याप्रमाणे दिनांक 06/12/2022 रोजी पासपोर्ट सेवा केंद्र राजापुर येथे माझ्या सर्व कागदपत्रांची छाननी करुन अर्ज पडताळणी करीता संबंधीत पोलीस स्टेशनला पाठविण्यात आला. त्यानंतर काही दिवसांनी माझ्या अर्जाच्या सद्यस्थितीबाबत ऑनलाईन पाहिले असता पोलीस पडताळणी अहवालामध्ये स्पष्टतः नसल्यामुळे अर्जाचे प्रादेशिक पासपोर्ट कार्यालयात पुर्नवालोकन सुरु असल्याचे ऑनलाईन स्टेटसवर दिसले. त्या दरम्यान मला माझ्या व्हॉट्सअँप वर अनोळखी इसमाचा फोन आला. सदर इसमाने आपले नाव शेखर नेवे रा.माहीम असे सांगितले तसेच माझा पासपोर्ट अर्ज प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय मुंबई येथे प्रलंबित आहे. तरी सदर अर्ज प्रक्रिया पुर्ण करुन तुम्हाला दहा वर्षासाठी नविन पासपोर्ट मिळवुन देतो त्याकरीता पासपोर्ट कार्यालयातील प्रकाश नामक अधिकारी यांना देण्यासाठी 1,80,000/- रुपये व स्वतःसाठी 5,000/- रुपये असे एकुण 1,85,000/- रुपये रक्कमेची मागणी केली होती. परंतु त्यावेळी मी त्यांना मला ऐवढी रक्कम देणे शक्य नसल्याचे सांगितले. त्यानंतर आठ दिवसांनी माझे फोनवर शेखर यांनी व्हॉटस्अप कॉल करुन एकुण 85,000/- रुपये रक्कमेची मागणी केली आहे. शेखर नेवे हे मागत असलेली ही लाच रक्कम असल्याचे माझी खात्री झाल्याने व मला त्यांना लाच रक्कम देण्याची इच्छा नसल्याने तसेच पासपोर्ट अर्ज संबंधित सर्व शासकीय फी यापुर्वी भरलेली असल्याने शेखर नेवे यांचेविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांचेकडे माझी लेखी तक्रार देत आहे. तरी शेखर नेवे यांचेवर योग्य ती कारवाई होणेस विनंती आहे. सोबत योग्य ती कागदपत्रे जोडत आहे. वगैरेबाबतचा लेखी तक्रार अर्ज मी दिनांक 31/01/2023 रोजी श्री.सुशांत चव्हाण, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी यांचे समक्ष लिहुन दिलेला आहे.

पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी मला दिनांक 01/02/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयात सकाळी 09.00 वाजता उपस्थित राहणेस सांगितले. त्याप्रमाणे दिनांक 01/02/2023 रोजी मी सकाळी 09.15 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी कार्यालयात उपस्थित राहुन पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांची भेट घेतली. पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी त्यांचेसोबत असणारे शासकीय पंच व लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय कर्मचारी यांची ओळख करुन दिली. त्यानंतर मी माझ्या तक्रारीची थोडक्यात हकीकत पंचांना सांगितली व पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण व पंचानी माझा तक्रारी अर्ज वाचुन त्यावर तसेच त्यासोबत सादर केलेल्या कागदपत्रांवर सहया केल्या. तक्रारी अर्ज व सोबतचे कागदपत्र पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी ताब्यात घेतले.

पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांना मी खाजगी इसम शेखर नेवे हे आज रोजी मुंबई येथुन येणा-या जनशताब्दी एक्सप्रेसने रत्नागिरी येथे 10.20 वाजता येणार असुन रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथे त्यांची भेट घेवुन त्यांचेसह रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथील हटेल संगम रिजेन्सी या ठिकाणी जावुन त्यांचेशी कामासंबंधी बोलणी करणार असल्याचे सांगितले. सदर तक्रारीची पडताळणी मला पंचासह हॉटेल संगम रिजेन्सी येथे पाठवुन करण्यात येणार असल्याचे व सदर भेटी दरम्यान माझे व खाजगी इसम श्री.शेखर नेवे यांचेत होणारे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरव्दारे मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करण्यात येणार असल्याचे पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी पंचाना व

मला सागितले.

पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी सोनी कंपनीचा डिजीटल व्हाईस रेकॉर्डर व नवीन सिलबंद मेमरी कार्ड आमचे समक्ष हजर केले. पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये मेमरीकार्ड घालुन त्यामध्ये अगोदरचे काहीही संभाषण ध्वनीमुद्रीत करण्यात आलेले नाही याबाबत पंचांची व माझी खात्री करून दिली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी स्वतःचे, माझे व पंचांचे पडताळणीसाठी जात असल्याचे निवेदन डिजिटल व्हॉईस रेकॉर्डरमधील मेमरी कार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले.

उर्वरीत पडताळणी कारवाई रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथे जावुन करण्यात येणार असल्याचे पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी सांगितले. त्याप्रमाणे पडताळणी पथक व पंच पोशि गावकर यांची खाजगी चारचाकी वाहन क्रमांक एम. एच . 08 ए.एक्स. 2409 या वाहनाने व पोना आंबेकर याचे मोटारसायकल क्रमांक एम.एच 08 ए.जे 4804 या वाहनाने तसेच माझे खाजगी वाहन क्रमांक एम.एच 08 ए.एन 8288 या वाहनाने रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथे जाणेकरीता रवाना झाले. ती वेळ 09.45 वाजताची होती. त्यानंतर हॉटेल संगम रिजेन्सी जवळ असलेल्या मोकळया जागेत पोहचलो. ती वेळ 10.05 वाजताची होती. त्यानंतर पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी मला खाजगी इसम शेखर नेवे यांची समक्ष भेट घेणेकरीता रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथे पाठविण्यात येणार असल्याचे सांगुन योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून तो माझे शर्टाचे आतील बनियानमध्ये लपविला. ती वेळ 10.22 वाजताची होती.

मी माझे खाजगी वाहन क्रमांक एमएच/08/एएन/8288 या वाहनाने खाजगी इसम नेवे यांची भेट घेण्यासाठी रत्नागिरी रेल्वे स्टेशन येथे आलो. माझ्या पाठोपाठ पंच क्र. 1 चव्हाण हे पोना आंबेकर यांचे सह त्यांचे मोटारसायकलने रेल्वे स्टेशन येथे आले. उर्वरीत पडताळणी पथक हॉटेल संगम रिजेन्सी जवळील मोकळया जागेत थांबुन होते. मी रेल्वे स्टेशन येथे पोहचल्यावर खाजगी इसम नेवे यांना फोन केला काही वेळाने खाजगी इसम नेवे हे माझे चारचाकी वाहनात येवुन बसले व आम्ही माझ्या वाहनाने हॉटेल संगम रिजेन्सीच्या रेस्टॉरंट मध्ये येवुन बसलो. काही वेळातच पंच नं. 1 चव्हाण व पोना आंबेकर असे आमच्या लगतच्या टेबलवर येवुन बसले. माझ्यात व खाजगी इसम नेवे यांचेत पासपोर्टच्या कामासंबंधी बोलणे चालु होते. त्यावेळी खाजगी इसम नेवे यांनी आपण आता अकरा वाजता प्रकाशला फोन करु.... त्यावेळी तुम्ही मी सांगतो त्याप्रमाणे बोला असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना वो कौन है प्रकाश असे विचारले त्यावेळी खाजगी इसम नेवे यांनी मला प्रकाश मंडल असे सांगितले. त्यावेळी मी खाजगी इसम नेवे यांना अधिकारी आहे का असे विचारले असता खाजगी इसम नेवे यांनी अधिकारीच्या पण वरचा आहे... पण तो कामाचा आहे असे सांगितले...तसेच त्यांचेषी पैशाचा विषय बोलायचा नाही असे सांगितले. त्यानंतर आमचेत कामासंबंधी बोलणे चालु होते त्या दरम्यान मी त्यांना बाकी आपलं हयाचं कसं काय करायचं व्यवहाराचं कसं काय असे विचारले त्यावेळी पासपोर्ट एजंट नेवे यांनी ते आपलं ठरल्याप्रमाणे असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना म्हणजे तुमचे असे विचारले... त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी आधी मला फोरटी फाय देणार आणि काम झाल्यावर फोरटी फाय.....फोरटी.....फोरटी फाय प्लस फोरटी असे सांगितले....त्यावर मी त्यांना आपले किती ठरले आहेत असे विचारले त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी एटी फाय असे सांगितले. त्यावर मी त्यांना एटी फाय किती असे विचारले....त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी एटीफाय.....ऐंशी प्लस पाच असे सांगितले. त्यावर मी ऐंशी प्लस पाच म्हणजे ऐंशी हजार....असे विचारले त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी प्लस पाच हजार माझे असे सांगितले. त्यावर मी त्यांना पाच हजार तुमचे....आता तुम्हाला आज किती दयायचे..किती देवु असे विचारले...त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी तुम्ही म्हटले ना मला फोरटी फाय देणार असे सांगितले...त्यावर मी त्यांना थोडे फार कमी करा असे सांगितले असता, पासपोर्ट एजंट नेवे यांनी कमी नाही करणार मी..असे सांगितले. त्यानंतर मी त्यांना आता हे सगळ्या ऑफीसमध्ये पैसे फिरतात म्हणजे हे प्रकाश मंडल घेणार असे विचारले त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी प्रकाश घेणार अजुन तीन ऑफीसर घेणार असे सांगितले. त्यावर मी त्यांना कोण कोण ऑफीसर असे विचारले असता पासपोर्ट एजंट नेवे यांनी ते एबीसी...रुटींन माणसं आहेत ती...असे सांगितले...त्यानंतर माझेत व खाजगी इसम नेवे यांचेत कामासंबंधी बोलणे चालु होते. त्या दरम्यान खाजगी इसम नेवे यांनी त्यांचे मोबाईलवरुन प्रकाश मंडल यांना फोन केला व स्पीकर ऑन करुन मला बोलण्यास दिले त्यावेळी आमचेत दहा वर्षाकरीता पासपोर्ट मिळणेबाबत [illegible]ये बोलणे चालु होते. त्या दरम्यान मी फोनवर बाकी सब आप बोले हे...वैसा किया हे...आप बोले हे तो सब किया है... इसके पास शेखर के पास दिया है असे सांगितले. त्यावर सदर इसमाने ओके...मै उसके ही कन्फर्मेशन के लिए रुका था..ओके नो प्रॉब्लेम असे सांगितले...त्यावर पासपोर्ट एजंट नेवे यांनी मसेजे कन्फर्मेशन हे जो व्हॉटसअप मे डालता हु...असे बोलले. त्यानंतर काही वेळाने फोन कट झाल्यानंतर मी रेस्टॉरंट मधुन बाहेर निघुन आलो. पंच चव्हाण देखील माझे पाठोपाठ बाहेर निघुन आले व आम्ही पडताळणी पथक थांबुन असलेल्या ठिकाणी आलो. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री. चव्हाण यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढुन तो बंद करुन त्याचे

ताब्यात घेतला. त्यावेळी खाजगी इसम नेवे हे रेस्टारंट मध्ये थांबुन असुन ते तात्काळ लाच रक्कम स्विकारणार असलेबाबत मी सांगितले

पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी डिजिटल व्हाईस रेकॉर्डर चालु करून मला व पंचाना महत्वाचे संभाषण ऐकविले. मी माझा व खाजगी इसम शेखर नेवे व प्रकाश मंडल यांचा आवाज ओळखला. खाजगी इसम नेवे यांनी माझा प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय बी.के.सी मुंबई येथे पुनरावलोकनाकरीता प्रलंबित असलेला पासपोर्ट नुतनीकरणाचा अर्ज मंजुर करुन देवुन मला दहा वर्षाच्या मुदतीचा नवीन पासपोर्ट मिळवुन देण्याकरीता प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय येथील अधिकारी प्रकाश मंडल व इतर अधिकारी यांचेकरीता 80,000/- रुपये व स्वतःकरीता 5,000/- रुपये असे एकुण 85,000/- रुपये लाच रक्कम मागणी केल्याचे व मागणी केलेल्या रक्कमेपैकी पहीला हप्ता म्हणुन प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय येथील अधिकारी प्रकाश मंडल यांचेकरीता 40000/- रुपये व स्वतःकरीता 5,000/- रुपये असे एकुण 45000/- रुपये लगेचच स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणीमध्ये आढळुन आले आहे. त्यामुळे सापळापुर्व व सापळा कारवाई लगेचच करणार असल्याचे व पडताळणी वेळेची स्क्रिप्ट नंतर बनविणार असल्याचे पो. उपअधीक्षक चव्हाण यांनी मला व पंचाना सांगितले.

पो.उपअधीक्षक चव्हाण यांच्या सुचनेवरुन मी लाचेची रक्कम रुपये 45,000/-(पंचेचाळीस हजार रूपये)(त्यामध्ये रु. 2000/- दराच्या 20 व रु. 500/- दराच्या 10 भारतीय चलनी नोटा) हजर केल्या. पोलीस उप अधीक्षक श्री. चव्हाण यांच्या सुचनेवरून माझी पंच नं. 1 चव्हाण यांनी अंगझडती घेतली. अंगझडतीत मिळुन आलेल्या चीजवस्तु व रोख रक्कम मला परत केल्या.

खाजगी वाहनात पो.उपअधीक्षक चव्हाण यांनी तक्रारदार पेडणेकर व आम्हा पंचाना अल्ट्राव्हायलेट दिवा व अँन्थ्रासीन पावडर दाखवून त्याचे उपयोग व गुणधर्म समजावून सांगितले. अँन्थ्रासीन पावडर लावलेल्या वस्तूवर अंधारामध्ये अल्ट्राव्हायलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता, त्या वस्तूवर अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट चकाकी दिसून येते. नेहमीच्या प्रकाशात तशी चकाकी दिसून येत नाही असा गुणधर्म असल्याचे सांगितले. मी हजर केलेली लाचेची रक्कम प्रथम नेहमीच्या उजेडात व नंतर खाजगी वाहनात काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात दाखविली त्या नोटा नेहमी सारख्याच दिसल्या.

पो.उप अधीक्षक श्री.चव्हाण यांच्या सूचनेवरुन पोहवा नलावडे यांनी लाचेची रक्कम एका कागदावर ठेवून नोटांच्या दोन्ही बाजूस हाताच्या बोटाने अँन्थ्रासीन पावडर लावली. त्यानंतर त्यांचे हात व नोटा नेहमीच्या प्रकाशात दाखविले. नोटा अगर त्यांच्या दोन्ही हातांच्या बोटांवर अँन्थ्रासीन पावडरची चकाकी दिसून आली नाही. त्यानंतर खाजगी वाहनात काळ्या कपडयाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून पोहवा नलावडे यांच्या हातामधील लाच रक्कमेवर पो. उप अधीक्षक चव्हाण यांनी अल्ट्राव्हॉयलेट दिव्याचा प्रकाश पाडला असता त्या नोटांवर दोन्ही बाजूस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. तशीच चकाकी पोहवा नलावडे यांच्या दोन्ही हाताच्या बोटांवर दिसून आली. त्यानंतर पुन्हा उजेड करण्यात आला. पो.उप अधीक्षक चव्हाण यांच्या सूचनेवरून पोहवा नलावडे यांनी खाजगी इसम शेखर नेवे यांना देण्यासाठी रू. 45,000/- नोंटाची घडी करुन माझे शर्टचे डावे खिशात ठेवली. त्यावेळी मला पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी सूचना दिली की, खाजगी इसम नेवे हे लाचेच्या रक्कमेची मागणी करेपर्यंत व लाच रक्कम देण्याची वेळ येत नाही तोपर्यंत त्यांनी सदर लाच रक्कमेला हात लावू नये.

सापळापुर्व कारवाई पुर्ण झाल्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी सापळा आयोजित करणार असल्याचे सांगितले. तसेच मी खाजगी इसम शेखर नेवे यांची लाच रक्कम देण्यासाठी भेट घेईन त्यावेळी आमच्यातील होणारे संभाषण डीजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत करणार असल्याचे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी सापळा कारवाई करीता जात असल्याबाबतचे स्वतःचे, माझे व पंचांचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर मधील मेमरीकार्डमध्ये ध्वनीमुद्रीत केले. सापळा कारवाईच्या अनुषंगाने मला, पंच व सापळा पथकातील सर्व सदस्यांना योग्य त्या सुचना देण्यात आल्या.

पो. उपअधीक्षक चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे अंगावरील शर्टचे आतील बनियनमध्ये लपविला. ती वेळ 11.12 वाजताची होती. मी चालत हॉटेल संगम रिजेन्सी येथील रेस्टॉरंट मध्ये गेलो. माझे पाठोपाठ पंच नं. 1 चव्हाण देखील रेस्टॉरंट मध्ये आले उर्वरीत सापळा पथक व पंच नं. 02 नरळे असे हॉटेल संगम रिजेन्सी रेस्टॉरंटच्या आसपास कोणासही संशय येणार नाही अश रितीने थांबुन होते. मी रेस्टॉरंट मध्ये गेलो माझे पाठोपाठ पंच नं.1 चव्हाण देखील रेस्टॉरंट मध्ये आले. खाजगी इसम नेवे रेस्टॉरंटमध्ये बसलेल्या टेबलच्या समोरील खुर्चीत जावुन बसलो. पंच नं.01 चव्हाण माझ्या बाजुच्या टेबल समोरील खुर्चीत बसले. माझेत व खाजगी इसम नेवे यांचेत बोलणे चालु होते. त्यावेळी त्यांनी मग मी तुम्हाला आता तुम्ही बोलल्याप्रमाणे देवु काय असे विचारले... त्यावर खाजगी इसम नेवे यांनी दया बिनधास्त दया... अहो माझेकडे काहीच त्रास नका घेवु असे बोलले... त्यावर मी नाय तसं नव्हे कमीचं काय बघितलत काय असे विचारले त्यावेळी खाजगी इसम नेवे यांनी

काहीच कमी नाही झालं..... मी हात जोडुन सांगतो कारण माझी डिल तशी झालेय...त्यावर त्यांनी मी कसं बोलण्याचा पक्का असतो. बोललेलो मी हे करतो असे बोलुन माझे डाव्या खिशातील लाच रक्कम उजव्या हाताने काढुन खाजगी इसम नेवे यांचे समोर धरली असता नेवे यांनी सदरची लाच रक्कम आपल्या उजव्या हाताने स्विकारुन आणि माझं वेगळं ते काय पैशाचं असे विचारले त्यावर मी त्यांना मोजुन घ्या प्लीज असे सांगितले. त्यावर खाजगी इसम नेवे यांनी मोजुन घ्यावे लागतील असे बोलले त्यावर मी त्यांना मोजावे लागणार तुम्ही मोजुन घ्या पंचेचाळीस हजार रुपये आहेत असे बोललो. त्यावेळी खाजगी इसम नेवे यांनी सदरची लाच रक्कम मोजुन पंचेचाळीस आहेत मी तुम्हाला व्हॉटस्‌अप करतो असे बोलले व लाच रक्कम त्यांचे टिशर्टच्या डाव्या बाजुच्या खिशामध्ये ठेवली. त्यावर मी त्यांना माझं काम झालं पाहीजे हा साहेब कारण तुम्ही बोललायत...मला ते पैसे दयायची इच्छा पण नव्हती असे बोललो. त्यानंतर मी रेस्टॉरंटच्या बाहेर येवुन सापळा पथकास खाजगी इसमांने लाच रक्कम स्विकारल्याचा पुर्वनियोजित इषारा म्हणुन माझा डावा हात माझे डोक्यावरून वारंवार फिरवून इषारा केला. त्यावेळी पो उपअधीक्षक चव्हाण यांनी माझेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो बंद करून तो स्वतःचे ताब्यात ठेवला. ती वेळ 11.18 वाजताची होती. त्यानंतर पो उपअधीक्षक चव्हाण यांनी मला लाच रक्कम कोणी स्विकारली याबाबत विचारणा केली असता, मी रेस्टॉरंट मध्ये जावुन खुर्चीत बसलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करून ते खाजगी इसम शेखर नेवे असल्याचे सांगितले. मी लाच रक्कम रू. 45,000/- माझे शर्टचे डावे खिशातुन उजवे हाताने काढून खाजगी इसम नेवे यांचेसमोर धरली असता त्यांनी ती रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारून दोन्ही हाताने मोजुन ती लाच रक्कम त्यांचे टि-शर्टच्या डाव्या बाजुच्या खिशात ठेवली असे सांगितले. लागलीच पो उपअधीक्षक चव्हाण यांनी खाजगी इसम नेवे यांचा उजवा हात व पोना आंबेकर यांनी डावा हात पकडुन जागीच यांना अटकावुन ठेवले ती वेळ 11.25 वाजताची होती.

पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी मला हॉटेल संगम रिजेन्सीच्या रेस्टॉरंट मध्ये बोलावुन रेस्टॉरंटच्या कोप-यात काळ्या कपडाच्या सहाय्याने कृत्रिम अंधार करून माझ्या हातांची व शर्टची अल्ट्राव्हॉयोलेट दिव्याखाली तपासणी केली असता त्यांच्या उजव्या हाताच्या अंगठयासह सर्व बोटांचे पेरांना व शर्टचे पुढील डावे बाजुचे खिशाचे वर व आतील बाजुस अँन्थ्रासीन पावडरची फिक्कट निळसर हिरवट रंगाची चकाकी दिसून आली. पंच नं. 1 चव्हाण यांनी माझी अंगझडती घेतली. त्यामध्ये सापळापुर्व कारवाईचे पुर्वी होत्या तशा वस्तु मिळुन आल्या. पो.उपअधीक्षक चव्हाण यांचे सुचनेवरून मी माझे हात धुतले.

त्यानंतर हॉटेल संगम रिजेन्सी रेस्टॉरंटमध्ये ग्राहकांची ये-जा व वर्दळ असल्याने पुढील सापळा कारवाई करीता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय रत्नागिरी येथे जाण्याबाबत पो.उप अधीक्षक चव्हाण यांनी पंच व सापळा पथक यांचेशी चर्चा करुन निश्चित केले. त्याप्रमाणे पो.उप अधीक्षक चव्हाण, पंच, सापळा पथक, खाजगी इसम नेवे व मी असे उपलब्ध असलेल्या खाजगी वाहनाने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय रत्नागिरी येथे आलो.

सदर ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री.चव्हाण यांनी माझे व खाजगी पासपोर्ट एजंट इसम शेखर नेवे यांचेशी समक्ष भेटी दरम्यान झालेले संभाषण ऐकवुन ते स्क्रिप्टप्रमाणे सारखेच असल्याची माझी खात्री करून दिली. मी माझा व खाजगी इसम श्री शेखर नेवे यांचा आवाज ओळखला.

पडताळणी कारवाईमध्ये खाजगी इसम नेवे यांनी पासपोर्ट कार्यालयातील अधिकारी प्रकाश मंडल यांचेकरीता 40,000/- रुपये व स्वतःकरीता 5000/- रुपये लाच रक्कमेची मागणी केल्याबाबत व मागणी केलेली लाच रक्कम सापळा कारवाईमध्ये खाजगी इसम नेवे यांनी पासपोर्ट कार्यालयातील अधिकारी प्रकाश मंडल यांचे वतीने स्विकारल्याचे निष्पन्न झालेले आहे. त्यामुळे पो उपअधीक्षक चव्हाण यांनी खाजगी इसम नेवे यांचेकडे प्रकाश मंडल यांचेबाबत अधिक चौकशी केली असता प्रकाश मंडल हे प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय बीकेसी मुंबई येथे डाटा ऑपरेटर असल्याची माहीती मिळाली. सापळा कारवाईतील त्यांच्या सहभागाची पडताळणी त्यांना फोनद्वारे कॉल करुन करण्यात येणार असल्याचे पो उपअधीक्षक चव्हाण यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सांगितले. त्यावेळी प्रकाश मंडल हे व्हाटस्‌अप कॉल केल्यास पैशाविषयी बोलतील असे खाजगी इसम नेवे यांनी सांगितले त्याप्रमाणे पो उपअधीक्षक चव्हाण यांचे सुचनेनुसार खाजगी इसम नेवे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9325927697 वरुन डाटा ऑपरेटर प्रकाश मंडल यांचा मोबाईल क्रमांक 7738123659 यावर व्हाटस्‌अप कॉल करुन स्पीकर ऑन केला. त्यावेळी पो उपअधीक्षक चव्हाण यांनी त्यांचेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन त्यांचेतील संभाषण मेमरीकार्ड मध्ये ध्वनीमुद्रीत केले ती वेळ 13.05 अषी आहे. त्यामध्ये खाजगी इसम नेवे यांनी विलास को मिला.... उसका दस साल का हो जाऐगा ना पासपोर्ट असे विचारले त्यावर प्रकाश मंडल यांनी अरे करके लेता ना मै हो जाऐगा करके लेता हु.. असे सांगितले त्यावर खाजगी इसम शेखर नेवे यांनी उसने पैसा भी दिया है फोरटी फाय थावजंड लेकिन वो तेरे को कहा देवु मैने फोरटी फाय थावजंड लिया है तो तुझे कहा देवु... असे विचारले असता प्रकाष मंडल

यांनी वही आ जाओ ना शाम को आ जाओ... असे सांगितले.. त्यावर खाजगी इसम नेवे यांनी चलेगा शाम को आता हु, लेकिन थोडा कुछ कम होइएगा...ना...असे विचारले असता प्रकाष मंडल यांनी अमर होता ना तो मै करता.... असे सांगितले. त्यानंतर त्यांचेत बोलणे होवुन कॉल कट झाला. त्यावेळी पो उपअधीक्षक चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर बंद केला. ती वेळ 13.07 अशी असुन ते मेमरीकार्ड मधील फाईल नंबर 11 येथे आहे. त्यानंतर लगेचच प्रकाश मंडल यांचा मोबाईल क्रमांक 7738123659 यावरुन खाजगी इसम नेवे यांनी त्यांचा मोबाईल क्रमांक 9325927697 यावर व्हाटस्अप कॉल आला. त्यावेळी पो उपअधीक्षक चव्हाण यांनी डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन मोबाईल जवळ धरला असता खाजगी इसम नेवे यांनी कॉल रिसीव्ह करुन ऑन केला ती वेळ 13.08 वाजताची आहे. त्यामध्ये पासपोर्ट बाबत कन्फर्मेशन देणेबाबत चर्चा झाली आहे.

तरी खाजगी इसम श्री शेखर मुरलीधर नेवे,रा. फ्लॅट नं. 23, श्री साई मथुरा प्रसाद को.ऑ.हा. सोसायटी लिमीटेड, पितांबर लेन, एम.एम.एस.सी. क्रॉस रस्ता नं. 2, माहीम (पश्चिम), मुंबई यांनी माझा प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय बी.के.सी मुंबई येथे पुनरावलोकनाकरीता प्रलंबित असलेला पासपोर्ट नुतनीकरणाचा अर्ज मंजुर करुन देवुन मला दहा वर्षाच्या मुदतीचा नवीन पासपोर्ट मिळवुन देण्याकरीता दिनांक 01/02/2023 रोजी 10.22 ते 11.01 वा. चे मुदतीत हॉटेल संगम रिजन्सीच्या रेस्टॉरंटमध्ये प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय येथील डाटा ऑपरेटर प्रकाश मंडल यांचेकरीता 80,000/- रुपये व स्वतःकरीता 5,000/- रुपये असे एकुण 85,000/- रुपये लाच रक्कम मागणी करुन मागणी केलेल्या रक्कमेपैकी पहिला हफ्ता म्हणुन प्रकाश मंडल यांचेकरीता 40000/- रुपये व स्वतःकरीता 5000/- रुपये स्विकारण्याचे मान्य केले.त्याप्रमाणे दिनांक 01/02/2023 रोजी 11.12 ते 11.18 वाजताचे सापळा कारवाई दरम्याने पडताळणीवेळी मागणी केलेल्या लाच रक्कमेपैकी पहिला हफ्ता म्हणुन प्रकाश मंडल यांचे वतीने 40000/- रुपये व स्वतः करीता 5000/- रुपये असे एकुण 45,000/- रुपये लाच रक्कम हॉटेल संगम रिजेन्सी येथील रेस्टॉरंट मध्ये पंचासमक्ष स्वतःचे फायद्याकरिता स्वीकारली म्हणुन माझी खाजगी इसम शेखर मुरलीधर नेवे व प्रादेशिक पासपोर्ट कार्यालय येथील डाटा ऑपरेटर प्रकाशकुमार झरी मंडल यांचे विरुध्द फिर्याद आहे.

माझा फिर्यादी जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहीला असता तो माझे सांगणे प्रमाणे बरोबर आहे.

समक्ष पंच 1-

( सुषांत बं.चव्हाण )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी.

पंच 2-